# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई - ४०० ००१.

दूरध्वनी - ३०२३३४१२, २२६९ ०६०२, २२६४ ११५०/५१, फॅक्स - २२६९ ०००७

E-mail : desk12@dtemaharashtra.gov.in Internet : www.dtemaharashtra.gov.in

क्रमांक १२/आस्था(१)/ग्रंथपाल/२०१९/१०६

दिनांक 6 MAR 2019

प्रति,

सहसंचालक,

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,

मुंबई/पुणे/नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपूर

विषय:- अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या शिफारशीनुसार राज्यात कार्यरत असणाऱ्या शासकीय, अनुदानित अशासकीय तंत्रनिकेतने, अभियांत्रिकी व औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालये तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ यांतील ग्रंथपाल या शिक्षक समकक्ष पदाचे नियत वयोमानानुसार सेवानिवृत्तीचे वय ५८ वर्षावरुन ६० वर्षे करण्याबाबत.

संदर्भ:- शासन निर्णय उच्च व तंत्र शिक्षण विभाग शासन निर्णय क्रमांक सवेआ-३२११/(९७/१५)/तांशि-२ दि. ०५.०३.२०१९

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने संदर्भात नमुद शासन निर्णयाची प्रत या सोबत जोडण्यात आली असून सदर शासन निर्णयाप्रमाणे आवश्यक ती कार्यवाही आपल्या स्तरावरुन तात्काळ करण्यात यावी. त्याअनुषंगाने केलेल्या कार्यवाहीचा संस्थानिहाय अहवाल या कार्यालयास विनाविलंब सादर करण्यात यावा.

(प्रमोद नाईक)
सहसंचालक,
तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

जा.क्र.विकाऔ/आस्था-३ /२०१९/९७९
दिनांक 19 MAR 2019

प्रति,

प्राचार्य, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, औरंगाबाद

प्राचार्य, शासकीय तंत्रनिकेतन,औरंगाबाद, जालना,अंबड,जिंतूर,हिंगोली,नांदेड,उस्मानाबाद, बीड

पु.ला.शा.तं.लातूर,.म.तं.नि.लातूर

यांना कळविण्यात येते की, संचालनालयाच्या वरील पत्रात नमुद केलेल्या शासन निर्णयाची प्रत या पत्रासोबत जोडण्यात येत असून त्यानुसार केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

प्र.सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद

प्रत:- या कार्यालयाच्या प्रोग्रामर यांना माहितीस्तव तसेच सदरचे पत्र या कार्यालयाच्या वेबसाईटवर अपलोड करण्यासाठी

"अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या शिफारशीनुसार राज्यात कार्यरत असणाऱ्या शासकीय, अुनदानित अशासकीय तंत्रनिकेतने, अभियांत्रिकी व औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालये तसेच डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ यातील ग्रंथपाल या शिक्षक समकक्ष पदाचे नियत वयोमानानुसार सेवानिवृत्तीचे वय ५८ वर्षावरुन ६० वर्षे करण्याबाबत..."

**महाराष्ट्र शासन**
**उच्च व तंत्रशिक्षण विभाग,**
**शासन निर्णय क्रमांक सवेआ-३२११/(९७/१५)/तांशि २,**
मंत्रालय, मादाम कामा रोड, मुंबई ४०० ०३२.
दिनांक :५ मार्च, २०१९

**वाचा :-**

१) अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेची क्रमांक F.No. ३७-३/Legal/२०१०, दिनांक ०५ मार्च, २०१० ची अधिसूचना.
२) शासन निर्णय क्रमांक उच्च व तंत्रशिक्षण विभाग SPC-२०१०/(३४/१०)/TE-२, दिनांक २० ऑगस्ट, २०१०
३) शासन निर्णय क्रमांक उच्च व तंत्र शिक्षण विभाग सवेआ-३२११/(९७/१५)/तांशि-२, दिनांक ०७ जानेवारी, २०१७

**प्रस्तावना :**

श्री. सकनुरे, सेवानिवृत्त ग्रंथपाल यांनी त्यांना वयाच्या ५८ ऐवजी ६० व्या वर्षी सेवानिवृत्त करावे याकरीता मा. उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ येथे रिट याचिका क्रमांक ३१०७/२००८ दाखल केली होती. सदर याचिकेत मा. न्यायालयाने दिलेल्या आदेशाच्या अनुषंगाने श्री. सकनुरे यांच्या सेवानिवृत्तीचे ५८ ऐवजी ६० करण्यात आल्याचे व तद्नुषंगिक लाभ देण्याबाबतचे आदेश संदर्भ क्रमांक ३ येथील दिनांक ०७.०१.२०१७ च्या शासन निर्णयान्वये निर्गमित करण्यात आलेले आहेत.

तथापि, तंत्रशिक्षणाशी संबंधीत संस्थांमधील इतर ग्रंथपालांना वयाच्या ५८ व्या वर्षी सेवानिवृत्त करण्यात येत असल्याने तंत्रशिक्षणाशी संबंधीत संस्थांमधील ग्रंथपालांचे सेवानिवृत्तीचे वय ६० वर्षे करण्याबाबत महाराष्ट्र प्रशासकिय न्यायाधिकरणात मुळ अर्ज दाखल करण्यात आले आहे.

२. उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या विद्यापीठ शिक्षण व महाविद्यालयीन शिक्षण या उपविभागांतर्गत कार्यरत असलेल्या ग्रंथपालांना वयाच्या ६० व्या वर्षी सेवानिवृत्त करण्यात येत आहे. तथापि, याच विभागाच्या तंत्रशिक्षणाशी संबंधीत संस्थांमधील ग्रंथपालांना वयाच्या ५८ व्या वर्षी सेवानिवृत्त करण्यात येत आहे.

*3.* मा. न्यायालयाने सेवाविषयक बाबींच्या अनुषंगाने दिलेल्या आदेशांनुसार विधी व न्याय विभागाने मा. मुख्य सचिवांच्या स्वाक्षरीने दिनांक २८/२/२०१७ रोजी परिपत्रक निर्गमित केलेले आहे. सदरच्या परिपत्रकातील सूचना विचारात घेता समान न्यायालयीन प्रकरणी समान कार्यवाही करणे आवश्यक आहे.

***(Therefore, the normal rule would be that merely because other similarly situatedpersons did not approach the court earlier, they are not to be treated differently)***

४. राज्यातील शासकीय, अनुदानित अशासकीय तंत्रनिकेतने, अभियांत्रिकी व औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालये तसेच तंत्रशास्त्र विद्यापीठ संस्थांमधील शिक्षक व ग्रंथपाल यांना अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या सहाव्या वेतन आयोगाच्या संदर्भात निर्गमित केलेल्या अधिसूचनांनुसार दिनांक ०१.०१.२००६ पासून सहाव्या वेतन आयोगाच्या शिफारशीनुसार समान वेतनश्रेणी लागू करण्याबाबतचा शासन निर्णय संदर्भ क्रमांक २ अन्वये निर्गमित करण्यात आला आहे.

५. उपरोक्त परिच्छेदांमध्ये नमूद केल्याप्रमाणे मा. उच्च न्यायालयाचे आदेश, विधी व न्याय विभागाचे परिपत्रक,मा. महाराष्ट्र प्रशासकिय न्यायाधिकरणात दाखल झालेली प्रकरणे,त्या मा. न्यायाधिकरणासमोर सादर केलेले निवेदन या बाबी घेऊन राज्यातील उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या अखत्यारीतील तंत्रशिक्षण संचालनालयांतर्गत असलेल्या शासकीय /अनुदानित अभियांत्रिकी/औषधनिर्माणशास्त्र/वास्तुशास्त्र महाविद्यालये /तंत्रनिकेतने, डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ व रसायन तंत्रज्ञान संस्थेतील ग्रंथपालांचे सेवानिवृतीचे वय ५८ वरून ते ६० वर्ष करण्याबाबतचा प्रस्ताव मा. मंत्रीमंडळाच्या दिनांक २०.०२.२०१९ च्या बैठकीमध्ये विचारार्थ ठेवण्यात आला होता. मा. मंत्रीमंडळाने याबाबत घेतलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने शासन आदेश निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :**

अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या संदर्भाधीन क्रमांक ०१ व ०२ येथील आदेश विचारात घेता राज्यातील उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या अखत्यारीतील तंत्रशिक्षण संचालनालयांतर्गत असलेल्या शासकीय/अनुदानित अभियांत्रिकी/औषधनिर्माणशास्त्र/वास्तुशास्त्र महाविद्यालये/ तंत्रनिकेतने तसेच, डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ व रसायन तंत्रज्ञान संस्थेतील ग्रंथपाल या शिक्षक समकक्ष पदाच्या सेवानिवृतीचे वय ५८ वर्षावरुन ६० वर्ष करण्यास खालील अटींच्या अधीन राहून शासन मंजुरी देत आहे :

(i) दिनांक ०१.०१.२००६ ते या शासन निर्णयाच्या दिनांकापर्यंत दरम्यानच्या कालावधीमध्ये सेवानिवृत्त होऊन २ वर्षांपेक्षा अधिक कालावधी झालेल्या ग्रंथपालांना वयाच्या ६० व्या वर्षी सेवानिवृत्त करण्यात आले आहे असे गृहीत धरून सेवानिवृत्तीचे लाभ व इतर सर्व अनुषंगीक लाभ देण्यात यावेत.

(ii) दिनांक ०१.०१.२००६ ते या शासन निर्णयाच्या दिनांकापर्यंत दरम्यानच्या कालावधीमध्ये सेवानिवृत्त होऊन २ वर्षांपेक्षा कमी कालावधी झालेल्या ग्रंथपालांना पुन्हा सेवेत सामावून घ्यावे. त्याअनुषंगाने त्यांना देय असणारे सर्व सेवाविषयक लाभ देण्यात यावेत.

(iii) या शासन निर्णयाच्या प्रसिद्धीनंतर सेवानिवृत्त होणा-या ग्रंथपालांना वयाच्या ६० व्या वर्षी सेवानिवृत्त करण्यात यावे.

२. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या सहमतीने त्यांच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक ०२/१९/सेवा-४, दि. १० जानेवारी,२०१९ अन्वये दिलेल्या मान्यतेच्या अनुषंगाने निर्गमित करण्यात येत आहे.

३. हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक २०१९०३०५१७३७३९१२०८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Prakash Bhaskarrao Avhad

Digitally signed by Prakash Bhaskarrao Avhad
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Higher and Technical Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=e09e7338f45626229cb6381e8154da93814d3127e9859a46e544f505defcd004, cn=Prakash Bhaskarrao Avhad
Date: 2019.03.07 16:58:38 +05'30'

**(प्रकाश भास्करराव आव्हाड)**
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

**प्रत,**

१. मा.राज्यपाल तथा कुलपती यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई.
२. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
३. मा.विरोधी पक्षनेता विधानसभा/ विधान परिषद, विधानमंडळ, मुंबई
४. मा.मंत्री, उच्च व तंत्रशिक्षण यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
५. मा.राज्यमंत्री, उच्च व तंत्रशिक्षण यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
६. संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
७. कुलगुरु, डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापिठ, लोणरे, माणगांव रेल्वे, महाड जि.रायगड
८. कुलगुरु, रसायन तंत्रज्ञान संस्था, माटुंगा, मुंबई
९. संचालक, लेखा व कोषागारे, महाराष्ट्र राज्य, मुंबई. (५ प्रति)
१०. सर्व विभागीय सह संचालक, तंत्रशिक्षण (तंत्रशिक्षण संचालनालयामार्फत)
११. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र १, मुंबई. (५ प्रती)
१२. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र २, नागपूर. (५ प्रती)
१३. महालेखापाल (लेखा परीक्षा), महाराष्ट्र १, मुंबई (५ प्रती)
१४. महालेखापाल (लेखा परीक्षा), महाराष्ट्र २, नागपूर (५ प्रती)
१५. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
१६. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी.
१७. संचालक, राज्य अभिलेख देखभाल अभिकरण अधिकारी.
१८. अवर सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
१९. सर्व सहसचिव/उपसचिव/अवर सचिव/कक्ष अधिकारी, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मुंबई.
२०. निवड नस्ती / तांशि २.